महाराष्ट्र राज्य लॉटरी

महाराष्ट्र "महाराष्ट्र नाताळ नवीन वर्ष भव्यतम" सोडतीची बक्षिस रचना व कार्यपध्दती बाबत .

**कार्यालयीन आदेश क्रमांकः मरालॉ- २०२३/ प्र.क्र. ९२ / लॉटरी-२**

नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : २० नोव्हेंबर, २०२३.

वाचा : उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी कार्यालय, वाशी, नवीमुंबई यांचे पत्र क्र. उपसं (वि व ले)/मरालॉ/ योजना /२७६२ /२०२३, दि. ०९/११/२०२३.

## कार्यालयीन आदेश :

महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या विविध लॉटरी सोडती केंद्र शासनाचे लॉटरी (विनियमन) अधिनियम १९९८व लॉटरी (विनियमन) नियम-२०१० प्रमाणे कार्यान्वित केल्या जातात. या कार्यालयीन आदेशान्वये उपसंचालक (वित्त व लेखा ) वाशी, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, " महाराष्ट्र नाताळ नवीन वर्ष भव्यतम " सोडत दिनांक **०९/०१/२०२४** रोजी सायंकाळी ४.०० वाजता खाली दिलेल्या बक्षिससंरचना व कार्यपध्दती प्रमाणे काढण्यात येईल.

२. "महाराष्ट्र नाताळ नवीन वर्ष भव्यतम" दिनांक ०९/०१/२०२४ रोजी काढण्यात येणार असून, या सोडतीच्या तिकीटांचे मूल्य रू. २००/- (GST सहीत) असून पहिले बक्षिस (सामायिक) रू.५१,००,०००/- **हमीपात्र** बक्षिस (एकूण तिकीट संख्येच्या ९०% तिकीटाची विक्री झाल्यानंतरच ) ठेवण्यात आले आहे. या सोडतीत एकूण १० मालिका असून प्रत्येक मालिकेत १० हजार तिकीटे या प्रमाणे एकूण १ लाख तिकीटे मुद्रीत करण्यात येणार आहेत. प्रत्येक मालिकेतील तिकीटांचे क्रमांक ०००० ते ९९९९ या प्रमाणे देण्यात आलेले आहेत

३. या सोडतीची तिकीट विक्री उपसंचालक (वि. व ले.),वाशी,नवीमुंबई कार्यालयामार्फत करण्यात येईल. त्यानुसार "महाराष्ट्र नाताळ नवीन वर्ष भव्यतम" या सोडतीची तिकीटे उपसंचालक (वि. व ले.), महाराष्ट्र राज्य लॉटरी,१ ला मजला, वाय-अे १, अतिरिक्त शॉप कम गोडाऊन, ए.पी.एम.सी. मार्केट,सेक्टर १९-बी, वाशी,नवीमुंबई-४००७०५ येथून विक्रेत्यांना उपलब्ध होतील. या सोडतीची तिकीट विक्री फक्त महाराष्ट्र राज्यातच करण्यात येईल. तसे तिकीटांवर छापण्यात येईल.

४. या सोडतीची तिकीट विक्री करताना महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या तिकीट विक्रेत्यांना या तिकीट विक्रीच्या १०० तिकीटांचे एका पुस्तकावरील (M.R.P. Rs.२००/- each ticket) तिकीटांच्या दर्शनी किंमतीवर खरेदी करण्यात आलेल्या या सोडतीच्या एकूण लॉटरी तिकीटांच्या दर्शनी किंमतीवर [वस्तु व सेवा करासह (GST)] पुढील प्रमाणे घाऊक सूट (Discount) देण्यात येईल.

| अ.क्र. | तिकीटांची संख्या | प्रस्तावित घाऊक सूट ( GST सहीत ) |
|---|---|---|
| १ | ५०० ते १०००० तिकीटे | १८% |
| २ | १०००१ ते २०००० तिकीटे | २२% |
| ३ | २०००१ ते ५०००० तिकीटे | २५% |
| ४ | ५०००१ ते १००००० तिकीटे | २६% |

Scanned with ACE Scanner

घाऊक विक्रेते सोडतीच्या प्रत्यक्ष खरेदी करतील त्या एकूण तिकीटांच्या संख्येवर (Actual number of total tickets purchased ) २% (GST वगळून) विशेष सूट देण्यात येईल. या बाबतच्या अटी व शर्ती, शासन निर्णय,वित्त विभाग क्रमांक मरालॉ २०१२/प्र.क्र.४७ /लॉटरी -२, दिनांक ०८/०५/२०१२ नुसार लागू राहतील.

५. या सोडतीच्या तिकीट छपाईचे आदेश उपसंचालक (वि. व ले.), महाराष्ट्र राज्य लॉटरी, १ला मजला, वाय-अे १, अतिरिक्त शॉप कम गोडाऊन, ए.पी.एम.सी. मार्केट,सेक्टर १९-बी, वाशी,नवीमुंबई या कार्यालयाकडून स्वतंत्ररित्या काढण्यात येईल. या सोडतीची तिकीट छपाई मे. साई सिक्युरिटी प्रिंटर्स प्रा. लि.,फरीदाबाद यांचेकडून करून घेण्यात येईल. या तिकीटाचे आकारमान २४ x १० cms असून यासाठी ९० GSM Indian Art Paper वापरण्यात येऊन छपाईचा दर रू.२८०/- प्रती चौ. से. प्रती लाख तिकीटे, असा राहील.

६ **"महाराष्ट्र नाताळ नवीन वर्ष भव्यतम"** सोडतींची बक्षिसरचना -

मालिका १० — प्रत्येक मालिकेत १०००० तिकिटे
तिकीटांचे क्रमांक: ०००० ते ९९९९ — एकूण तिकिटे १०००००
सोडत दिनांक : ०९/०१/२०२४ — तिकीटांची किंमत रू. २००/- (GST सहीत)
सोडतीची वेळ : सायं. ४.०० वाजता.

| बक्षिसे | बक्षिसाची रक्कम रू. | प्रत्येक मालिकेतील बक्षिसांची एकूण संख्या | सर्व मालिकांतील बक्षिसांची एकूण संख्या | सर्व मालिकांतील बक्षिसांची एकूण रक्कम रू. | एकूण विक्रेता बोनस |
|---|---|---|---|---|---|
| पहिले सामायिक हमीपात्र बक्षिस (पूर्ण क्रमांक) **(एकूण तिकीट संख्येच्या ९०% तिकीटांची विक्री झाल्यानंतरच)** | ५१,००,००० | -- | १ | ५१,००,००० | ५१,००० |
| दुसरे बक्षिस (पूर्ण क्रमांक) ( १० क्रमांक) (सर्व मालिकांसाठी) | १०,००० | १० | १०० | १०,००,००० | |
| तिसरे बक्षिस (पूर्ण क्रमांक) (१० क्रमांक) (सर्व मालिकांसाठी) | ५,००० | १० | १०० | ५,००,००० | |
| चौथे बक्षिस (पूर्ण क्रमांक) (१० क्रमांक) (सर्व मालिकांसाठी) | २,००० | १० | १०० | २,००,००० | |



Scanned with ACE Scanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पाचवे बक्षिस (पूर्ण क्रमांक) (१० क्रमांक) (सर्व मालिकांसाठी) | १,००० | १० | १०० | १,००,००० | |
| सहावे बक्षिस ( कोणतेही पूर्ण अंकाचे ३५० क्रमांक सर्व मालिकांसाठी ) (Random पध्दतीने) | ५०० | -- | ३५०० | १७,५०,००० | |
| | | एकूण :- | ३९०१ | ८६,५०,००० | ५१,००० |

७. घाऊक विक्रेत्याने ज्या किरकोळ विक्रेत्यास तिकीटे विकली असतील त्या किरकोळ विक्रेत्यांची यादी घाऊक विक्रेत्याने पुढील तिकीट खरेदीच्यावेळी महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या, वाशी, नवीमुंबई या कार्यालयात सादर करणे बंधनकारक आहे.

८. सोडतीची कार्यपध्दती :-

"महाराष्ट्र नाताळ नवीन **वर्ष भव्यतम"** या सोडतीकरीता सोडतीचे ठिकाणी ठळकपणे दिसतील अशा ठिकाणी १ ड्रम ठेवण्यात येईल. त्या ड्रममध्ये मालिकांचे अद्याक्षरे/क्रमांक असतील. या सोडतीमध्ये १० मालिका आहेत. प्रत्येक मालिकेमध्ये ०००० ते ९९९९ असे तिकीटांचे क्रमांक असतील. या सोडतीमधील बक्षिस विजेत्या तिकीटाचे क्रमांक निश्चित करण्यासाठी विजेवर चालणाऱ्या व चक्रावर रॅन्डम क्रमांक लावलेल्या सोडत यंत्राचा ( ड्रॉ मशीन ) वापर केला जाईल. या यंत्राच्या प्रत्येक चक्रावर ० ते ९ अंक असतील. पंचमंडळाच्या अध्यक्षांनी घंटी वाजविल्यावर सोडत यंत्र फिरविले जाऊन सोडतीची सुरुवात होईल. सोडत यंत्र फिरवायचे थांबल्यानंतर जे क्रमांक यंत्रावर दिसतील अध्यक्ष तो अंक घोषित करतील. अंक ज्या क्रमाने निघतील त्या क्रमाने फलकावर प्रदर्शित केले जातील.

या सोडतीमधील दुसरे, तिसरे, चौथे, पाचवे व सहावे बक्षिस काढण्याची कार्यपध्दती पुढील प्रमाणे राहील.

८.१) दुसरे बक्षिस रू. १०,०००/- दुसऱ्या रु.१०,०००/- च्या बक्षिसासाठी विजेवर चालणारे व चक्रावर रॅन्डम क्रमांक लावलेले सोडत यंत्र (ड्रॉ मशीन) पंचामार्फत फिरवण्यात येईल व पूर्ण अंकाचा एक क्रमांक, याप्रमाणे १० क्रमांक स्वतंत्ररित्या निश्चित करण्यात येतील. ज्या तिकीटामध्ये असा क्रमांक आला असेल, अशी सर्व तिकीटे सर्व मालिकांसाठी रू. १०,०००/- च्या दुसऱ्या बक्षिसासाठी पात्र असतील.

८.२) तिसरे बक्षिस रु. ५,०००/- तिसऱ्या रू.५,०००/- च्या बक्षिसासाठी विजेवर चालणारे व चक्रावर रॅन्डम क्रमांक लावलेले सोडत यंत्र (ड्रॉ मशीन) पंचामार्फत फिरवण्यात येईल व पूर्ण अंकाचा एक क्रमांक, याप्रमाणे १० क्रमांक स्वतंत्ररित्या निश्चित करण्यात येतील. ज्या तिकीटामध्ये असा क्रमांक आला असेल, अशी सर्व तिकीटे सर्व मालिकांसाठी रु. ५,०००/- च्या तिसऱ्या बक्षिसासाठी पात्र असतील.



Scanned with ACE Scanner

८.३) **चौथे बक्षिस रू. २,०००/-** चौथ्या रु.२,०००/- च्या बक्षिसासाठी विजेवर चालणारे व चक्रावर रॅन्डम क्रमांक लावलेले सोडत यंत्र (ड्रॉ मशीन) पंचामार्फत फिरवण्यात येईल व पूर्ण अंकाचा एक क्रमांक, याप्रमाणे १० क्रमांक स्वतंत्ररित्या निश्चित करण्यात येतील. ज्या तिकीटामध्ये असा क्रमांक आला असेल, अशी सर्व तिकीटे सर्व मालिकांसाठी रु. २,०००/- च्या चौथ्या बक्षिसासाठी पात्र असतील.

८.४) पाचवे बक्षिस रू. १,०००/- पाचव्या रु. १,०००/- च्या बक्षिसासाठी विजेवर चालणारे व चक्रावर रॅन्डम क्रमांक लावलेले सोडत यंत्र (ड्रॉ मशीन) पंचामार्फत फिरवण्यात येईल व पूर्ण अंकाचा एक क्रमांक, याप्रमाणे १० क्रमांक स्वतंत्ररित्या निश्चित करण्यात येतील. ज्या तिकीटामध्ये असा क्रमांक आला असेल, अशी सर्व तिकीटे सर्व मालिकांसाठी रु. १,०००/- च्या पाचव्या बक्षिसासाठी पात्र असतील.

८.५) सहावे बक्षिस रू. ५००/- :- सहाव्या रु. ५००/- च्या बक्षिसासाठी संगणकावर पूर्ण अकांचे ३५० क्रमांक स्वंतत्ररित्या रॅन्डम पध्दतीने काढण्यात येतील व ते क्रमांक सर्व मालिकांसाठी रू.५००/- च्या सहाव्या बक्षिसासाठी पात्र असतील.

८.६) **पहिल्या क्रमाकांचे रू. ५१,००,०००/- चे सामायिक हमीपात्र बक्षिस (एकूण तिकीट संख्येच्या ९०% तिकीटांची विक्री झाल्यानंतरच):**

"महाराष्ट्र नाताळ नवीन वर्ष भव्यतम" " या सोडतीमध्ये दहा मालिकांमधून रूपये एकावन्न लाखाचे पहिले सामायिक **हमीपात्र बक्षीस ( एकूण तिकीट संख्येच्या ९०%** तिकीटांची विक्री झाल्यानंतरच) ठेवण्यात आले आहे. त्यासाठी प्रत्येक मालिकेची आद्याक्षरे व क्रमांक असलेली प्रत्येकी एक चकती घेण्यात येऊन ती प्रत्येक चकती स्वतंत्र प्लॅस्टिक/रबरी आवरणात घालून पंचमंडळाच्या समोर स्वतंत्र ड्रममध्ये ठेवली जाईल. अध्यक्षांनी घंटी वाजवून इशारा केल्यावर ड्रमÖ फिरविला जाईल व अध्यक्षांनी पुन्हा घंटी वाजवून इशारा केल्यावर ड्रम थांबविण्यात येईल. ड्रममधून एकच पिशवी (पाऊच) बाहेर काढून त्यातून चकती बाहेर काढण्यात येईल व ती पंचमंडळाला दाखविण्यात येईल. अध्यक्ष त्या चकतीवरील मालिकेच्या अद्याक्षरांची घोषणा करतील. त्यानंतर वरील परिच्छेद ८ मध्येä विहित केलेल्या पध्दतीने भाग्यवान क्रमांक काढण्यात येईल.

९. पंचमंडळाचे सदस्य त्यांना पुरविलेल्या बक्षिस विजेत्या क्रमांकाच्या नोंदवहीत विजेत्या क्रमांकाची नोंद करुन घेतील व त्या प्रतीवर सही करतील आणि ती प्रत निकालाच्या अभिलेखाची विश्वसनीय प्रत म्हणून ठेवली जाईल.

१०. या सोडतीमध्ये कोणत्याही मालिकेमध्ये एकापेक्षा जास्त भाग्यवान क्रमांक निश्चित करताना एखादा क्रमांक पुन्हा आल्यास तो रद्द करुन त्या ऐवजी पुन्हा नवीन भाग्यवान क्रमांक निश्चित करण्यात येईल.

११. या सोडतीतील बक्षिस विजेत्याने कोणत्याही बक्षिसाची मागणी करताना त्यास मूळ तिकीट



Scanned with ACE Scanner

शासनाकडे सादर करणे बंधनकारक राहील, तसेच कोणत्याही तिकीटांवर एकाच बक्षिसाची मागणी करता येईल.

१२. महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या कोणत्याही सोडतीमधील एखादया बक्षिसाकरिता एकापेक्षा जास्त पूर्ण भाग्यवान क्रमांक काढण्यात येत असतील, अशावेळी कोणत्याही क्रमांकाची त्याच मालिकेत पुनरावृत्ती झाल्यास किंवा दोन्ही क्रमांक / एकापेक्षा जास्त क्रमांक सारखे आल्यास नंतर काढलेले क्रमांक रद्द करुन त्या ऐवजी नवीन क्रमांक काढण्यात येतील.

१३. या सोडतीमधील बक्षिस विजेत्या तिकीटाचे क्रमांक निश्चित करण्यासाठी ड्रम किंवा विजेवर चालणारी व चक्रावर क्रमांक लावलेली (ड्रॉ मशीन) सोडत यंत्र, वा त्याचप्रमाणे सोडत जलद काढण्याच्या शासनाच्या दृष्टीने योग्य पद्धतीचा अवलंब सोडत काढताना करण्यात येईल.

तसेच संगणकातील तांत्रिक बिघाड, विजपुरवठा खंडीत, नैसर्गिक आपत्ती इ. कारणांमुळे जर सोडत काढता आली नाही तर ती सोडत दुसऱ्या दिवशी काढून निकाल जाहिर करण्यात येईल.

१४. सदरच्या सोडतीची कार्यपध्दती पूर्ण झाल्यानंतर शासनाच्या विहित तरतूदीं / कायद्यानुसार या सोडतीच्या निकालाची प्रसिध्दी शासनाच्या राजपत्रात करण्याची कार्यवाही उपसंचालक (वि.व ले.), महाराष्ट्र राज्य लॉटरी,१ ला मजला, वाय-अे १, अतिरिक्त शॉप कम गोडाऊन, ए.पी.एम.सी. मार्केट,सेक्टर १९-बी, वाशी,नवीमुंबई-४००७०५ या कार्यालयाकडून करण्यात येईल व याबाबतची संपूर्ण जबाबदारी त्यांची राहिल.

१५. या सोडताच्या तिकीट छपाईचा खर्च हा मागणी क्र. जी -२, २०७५-संकीर्ण सर्वसाधारण सेवा, (००) १०३ राज्य लॉटरी, लॉटरी संचालनालय (२०७५० ४७२), (००) (०१) प्रमुख लॉटरी, १६ - प्रकाशने तसेच बक्षिस विजेत्या तिकीटांचा खर्च हा मागणी क्र. जी - २, २०७५, संकीर्ण सर्वसाधारण सेवा १०३ राज्य लॉटरी, लॉटरी संचालनालय (२०७५०४७२), (००) (०१) प्रमुख लॉटरी, ०५ - बक्षिसे व इतर अनुषंगिक सोडत खर्च ( निकाल प्रसिध्दी व सोडतीचा खर्च) या लेखाशिर्षामधील सन २०२३-२४ मधील उपलब्ध तरतूदींतून भागविण्यात **येईल**.

१६. भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाचे Notification No.**4/2017-** Central Tax (Rates) दिनांक २८/०६/२०१७ मध्ये पुढील प्रमाणे तरतुद आहे.

| **Sr. No.** | **Tariff item, sub-heading, heading or chapter** | **Description of supply of Goods** | **Supplier of goods** | **Recipient of supply** |
|---|---|---|---|---|
| 5. | -- | Supply of lottery | State Government, Union Territory or any local authority | Lottery distributor or selling agent. *Explanation.*- For the purposes of this entry. lottery distributor or selling agent has the same meaning as assigned to it in clause (c) of Rule 2 of the Lotteries (Regulation) Rules, 2010, made under the provisions of sub-section I of section II of the lotteries (Regulations) Act, 1998 (17 of 1998). |



Scanned with ACE Scanner

केंद्र शासनाचे लॉटरी (विनियमन) नियम २०१० च्या नियम २ (c) मध्ये " distributor or selling agent" means an individual or a firm or a body corporate or other legal entity under law so appointed by the Organizing State through an agreement to market and sell lotteries on behalf of the Organizing State" असे नमूद आहे. तथापि, सदर तरतुदींनुसार महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या पारंपारिक लॉटरी सोडतींच्या तिकीट विक्रीसाठी शासनाने करार करून कोणीही अधिकृत विक्रेता नियुक्त केलेला नाही. त्यामुळे वरील नमूद नोटीफिकेशन मधील तरतुदींनुसार अधिकृत वितरक / विक्रेता वस्तु व सेवा कर भरणा करण्यासाठी अस्तित्वात नाही. अशा परिस्थितीत वस्तु व सेवा कर वसूल करून भरण्यासंदर्भात आयुक्त, वस्तु व सेवा कर कार्यालयाने पुढील प्रमाणे स्पष्टीकरण दिलेले आहे.

" If State Government supplies these lottery Tickets directly to any person, who is not legally appointed/authorized as lottery distributor or selling agent as described in clause (c) of Rule 2 of the Lotteries (Regulation) Rules, 2010,- Tax shall be collected and shall be paid by State Government only, as aforesaid."

तरी वरील स्पष्टीकरणानुसार महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या या प्रस्तावित सोडतींवरील लॉटरी तिकीटांच्या विक्रीवर तिकीट विक्रेत्यांकडून केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार विहित केलेल्या दराने वस्तु व सेवा कर वसूल करून विहित पध्दतीने शासनाकडे भरण्याची कार्यवाही उपसंचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी कार्यालय, वाशी, नवीमुंबई यांनी करावी व याबाबतची संपूर्ण जबाबदारी त्यांची राहिल.

१७. सदर कार्यालयीन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www lottery.maharashtra.gov.in या (Website) संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

( स्वाती विचारे )
अवर सचिव तथा उपसंचालक,
महाराष्ट्र राज्य लॉटरी, वित्त विभाग.

प्रति,

१. आयुक्त, राज्य लॉटरी,वित्त विभाग, मुंबई-३२.
२. उप सचिव (राज्य लॉटरी) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-२१.
४. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई-३२.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई-५१.
७. उप संचालक (वित्त व लेखा), महाराष्ट्र राज्य लॉटरी,वाशी, नवीमुंबई.
८. लेखाधिकारी, लॉटरी संचालनालय, मुंबई.
९. निवड नस्ती, लॉटरी -२.



Scanned with ACE Scanner